# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन खाते जी/उत्तर विभाग

**क्र.जी/उ/ १९२२/स.अभि(घ.क.व्य)/एस.आर.दि.०४.०८.२०२२**

## स्वारस्य अभिव्यक्ती

**जाहिरात**

विषय :-माहे सप्टेंबर २०२२ मध्ये येणा-या गणेशोत्सवा करीता दादर-माहीम चौपाटीवर व धारावी येथील कृत्रिम तलावाच्या ठिकाणी गणेश विसर्जना-निमित्त साफ-सफाई व निर्माल्य व्यवस्थापन करणेकरीता सामाजिक संस्थेकडून स्वयंसेवक घेण्यासाठी सोडत करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार जी/उत्तर विभागातील गणेशोत्स -२०२२ दादर-माहीम चौपाटीवर व धारावी येथील कृत्रिम तलावाच्या ठिकाणी गणेश विसर्जना-निमित्त साफ सफाईचे काम करण्यासाठी अशासकीय संस्थाचे स्वयंसेवक नेमणूक करण्यासाठी जी/उत्तर विभागातील स्थानिक अशासकीय नोंदणीकृत जसे मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, महिला बचत गट इ.यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर कामासाठी दि.०१.०४.२०२० पूर्वी नोंदणी केलेल्या व मागील २ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व साफ-सफाईचा अनुभव असलेल्या संस्थांची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

तसेच अर्जाचा नमुना जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांच्या कार्यालयात रु.२२०/- अधिक १८ टक्के जीएसटी असे एकूण रु.२६०/- रोख स्वरुपात(ना परतावा) व अनामत रक्कम रु.५००/-(परतावा) या अटीवर दि.०५.०८.२०२२ ते दि.१०.०८.२०२२ सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० यावेळेतच विकत मिळू शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/उत्तर योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उत्तर कार्यालयात घ.क.व्य. विभाग जी/उत्तर,पहिला मजला, रुम नं.३५ येथे संपर्क करावा. संस्थेने जी/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख ११.०८.२०२२ (दु.०१.०० वाजेपर्यंत) असेल. नमूद केलेल्या कार्यालयीन कालीवधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.) ,जी/उत्तर**